# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी-२०२४-२५/शिष्यवृत्ती शाखा/६५२१ दिनांक : ०५.०८.२०२४

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
३. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
४. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
५. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - शिष्यवृत्ती योजनांची सन २०२४-२५ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भ : - १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/ प्र.क्र. ३३२/ तांशि-४ दि. ०७.१०.२०१७.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. शिष्यवृ. २०२४/ प्र.क्र. १०५/ तांशि-४ दि. ०८.०७.२०२४.
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिस/शिष्य- २०२४-२५/मुमोशि/३८५३ दि. १९.०७.२०२४.
४. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. महाडीबीटी-२०२४-२५/मुलींनामोफतशिक्षण/शिष्यवृत्ती शाखा/६३७६ दि. २३.०७.२०२४.
५. या कार्यालयाचे पत्र क्र. महाडीबीटी-२०२४/शिष्यवृत्ती शाखा/६४६६ दि. २६.०७.२०२४.

शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्र निकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा प्रवेशीत अभ्यासक्रमाच्या मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचे नियमानुसार लाभ देण्यात येतो.

तसेच संदर्भित शासन निर्णय क्र. २ अन्वये व्यावसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process- CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील नविन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेश असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण

विभाग या विभागाकडून वर्ष २०२४-२५ पासून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येणार आहे. याबाबत या कार्यालयाकडून संदर्भ क्र. ४ च्या परिपत्रकाद्वारे विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांना तसेच आपणांस अगोदरच सविस्तरपणे निर्देश देण्यात आले आहेत.

**तरी या विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्त्यांचे लाभ देण्यासाठी विविध अभ्यासक्रम निहाय विविध शुल्कास महाडीबीटी पोर्टलवरुन मान्यता देण्यासाठी आपण शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी अभ्यासक्रमनिहाय जे शुल्क अनुज्ञेय केलेले आहे त्याची माहिती ईमेलद्वारे सादर करण्याबाबत या कार्यालयाने संदर्भ क्र. ५ च्या पत्रान्वये आपणास कळविले होते. परंतु अजूनही याबाबत या कार्यालयास आपण कोणतीही माहिती सादर केलेली नाही. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता या कार्यालयाने संदर्भ क्र. ५ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार आपल्या विद्यापीठातील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमनिहाय तसेच अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित अभ्यासक्रमनिहाय माहिती दि. ०८ ऑगस्ट, २०२४ रोजी माहितगार कर्मचाऱ्यामार्फत या कार्यालयात हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीसह सादर करावी.**

**(डॉ. केशव तुपे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १६ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या अभ्यासक्रमनिहाय सर्व शुल्क बाबी**

| Sr. No. | अभ्यासक्रमाचे नाव | विद्यापीठाकडून प्राप्त महाविद्यालयांकरीता महाडीबीटी पोर्टलवर नमूद करावयाच्या उपलब्ध सर्व शुल्क बाबी | महाविद्यालयांनी माहिती भरावयाच्या इतर शुल्कांच्या बाबी | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता शुल्क |
|---|---|---|---|---|
| 1 | | Admission Fee | Admission Fee | |
| 2 | | Session Fee | Session Fee | |
| 3 | | Laboratory Fee | Laboratory Fee | |
| 4 | | Semester Fee | Semester Fee | |
| 5 | | Library Fee | Library Fee | |
| 6 | | Gymkhana Fee | Gymkhana Fee | |
| 7 | | Study Tour | Study Tour | |
| 8 | | Enrollment Fee | Enrollment Fee | |
| 9 | | Project Fee | Project Fee | |
| 10 | | Other Fee | 1. College Magzine Fee | |
| | | | 2. Computer Training Fee | |
| | | | 3. Extra Curriculum/ Activity Fee | |
| | | | 4. Registration Charges | |
| | | | 5. Student ID Chrarges | |
| | | | 6. University Development Fund | |
| | | | 7. University Ashwamedh Fund | |
| | | | 8. University Sports Fund | |
| | | | 9. University Medical Aid Fund | |
| | | | 10.University Students Assistance Welfare Fund | |
| | | | 11. University Student Insurance Fund | |
| | | | 12. Youth Festival Charges | |
| 11 | | Tution FEE | Tution FEE | |
| 12 | | Development Fee | Development Fee | |
| 13 | | Exam Fee | Exam Fee | |